*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. IX / Issue – I* *ISSN 2277-8063*

# राष्ट्रीय राजकारणात महाराष्ट्र विधानसभा निवडणूक प्रभाव आणि पक्षीय संदर्भ

**डॉ. राजू कमलेश सावंत,** एन. डी. पाटील नाईट कॉलेज, आर्टस् ॲण्ड कॉमर्स, सांगली

---

**प्रस्तावना :**

भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि त्यापासून भारतात आणि महाराष्ट्रात विकासाला चालना मिळाली व सर्व संदर्भ पक्षाच्या विचारात्मक उद्देशाने भारतात आणि महाराष्ट्रात विकासाला वेग मिळाल्याचे एक महत्त्वाचे कारण ठरले. भारतात पक्षांचा विचार केला असता भारतात भाजप आणि काँग्रेस या पक्षातील वर्चस्व आले तरी विकासाला चालना मिळत असते. तसेच राजकारणाच्या विषयात कोणताही पक्ष विकासात्मक विषयाची चर्चा करत असते. त्यामुळे महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार आले आणि त्याच्यामध्ये प्रत्यक्ष विचार हा राजकारणाचा केला असता तर भाजप पक्षाचे जास्तीत जास्त आमदार निवडून आले. त्यामुळे महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात उत्सुकता होती ती म्हणजे कोणत्या पक्षाचे सरकार स्थापन होणार या महाराष्ट्रात आणि महाराष्ट्रातील विकासाला जास्तीत जास्त विकासाच्या वाटेवर कोणता पक्ष घेवून जाणार हा प्रश्न सर्व जनतेला वाटत होता.

महाराष्ट्रात निवडणूक झाली आणि महाराष्ट्राची युती पारड्यात भरभरून मतांचा डोंगर प्रस्तापित केला. त्यामुळे युतीच्या निवडणुकीमुळे भारतात या अवस्थेत महाराष्ट्राच्या विकासाला जास्तीत जास्त मोठ्या प्रमाणात ही चालना मिळाली, कारण महाराष्ट्र विकास आघाडीच्या सरकारमुळे राजकारणातील उमेदवारांना जास्त मोठ्या प्रमाणात चालना मिळण्याचे महत्त्वाचे एक कारण स्पष्ट झालेले आहे. महाराष्ट्रात महायुतीचे सरकार हे आले नाही कारण भाजप आणि शिवसेना यापक्षांत एकमेकांचा मेळ बसला नाही, कारण त्याच्यामध्ये शरद पवार साहेबांची जादू ही मोलाची ठरली आहे का? याचे कारण शरद पवारांचा राजकीय प्रवास पाहिला असता तर कित्येक वर्षांपासून त्यांना महाराष्ट्रातील नव्हे तर भारतदेशाच्या बाहेरचा राजकारणाचा अनुभव त्यांना हा महत्त्वाचा ठरला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचे सरकार स्थापन करण्याचे त्यांनी स्वप्न साकारले आहे. उमेदवार कोणताही निवडून आला असता आणि नरेंद्र मोदी यांचा सरकारला निवडून द्यायचे आहे, असे ठरवले म्हणजे असा अंदाज लोकांच्या (जनतेच्या) मनामध्ये आला आणि महाराष्ट्रात सत्ता प्रस्तापित करणे हे नरेंद्र मोदी यांना अशक्य झाले.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम माहितीचा आधार घेतला असून संदर्भग्रंथ, वृत्तपत्र, इंटरनेट, लेख, मासिके आणि पक्षीय राजकारणी लेख यांचा आधार घेवून विश्लेषन करण्याचा प्रयत्न केलेला आहे व तसेच मासिकांचा आधार घेतला आहे.

**उद्दिष्ट्ये :**

१. केंद्रीय सरकारचा विधानसभा निवडणुकीवर पडलेला प्रभाव अभ्यासने.

२. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३. विधानसभा निवडणुकीवर शरद पवार साहेबांची जादू आणि जनतेवर पडलेला प्रभाव अभ्यासणे.

**विषय विवेचन :**

**विधानसभा निवडणुकीतील राजकीय भूमिका :**

विधानसभा निवडणुकीत राजकीय भूमिका ही मांडली आहे की आज भारत देशाचा विचार केला असता भारत देशात एकूण राष्ट्रीय पक्ष हे ससात आहेत. त्यामुळे त्यापैकी काँग्रेस, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस यासारखे पक्ष महाराष्ट्रात राजकारणाचा केंद्रीय (राष्ट्रीय) पक्षाची भूमिका ही निर्णायक लक्षवेधी असल्याचे आपणाला दिसून येते. कारण परिस्थिती २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आपणास पाहावयाला मिळते, म्हणजेच त्याचे कारण म्हणजे राष्ट्रीय सत्ताधाऱ्यांचा राजकारणातील वाढता प्रभाव हेच आहे आणि २०१९ च्या विधानसभा निवडणुकीचा वेगवेगळ्या पक्षात ३२३७ उमेदवारांनी निवडणूक लढवली आहे. जनसामान्य लोकांनी उमेदवाराला मतदार न करता त्या विशिष्ट पक्षाच्या वैचारिक महत्त्व तत्त्वप्रणालीला मतदान केल्याचे जनतेला दिसून आले. या केंद्रीय पक्षाच्या प्रभावामुळे आज महाराष्ट्राच्या राजकारणात एक वेगळा वैचारिक अभिसरण जनतेला निर्माण झाला आहे.

**लोकसभा निवडणूका राजकारण आणि समाजकारण :**

लोकसभा निवडणूका चालू असताना राजकारणापुरता विचार हा केला होता. नव्या सरकारकडून राज्य हिताचा विचार राज्यातील विधानसभा निवडणुकांचा निकाल काहींना अपेक्षित असतो तर बऱ्याच जनांना अनपेक्षीत आशा लागली कारण जगाच्या आकडेवारीत फरक झाला असला आणि अनेकांना पराभवाचा धक्का सहन करावा लागला. राजकीय पक्ष म्हणून एकमेकांच्या महत्त्वकांक्षा वेगळ्या सल्या तरी पण त्यापेक्षा लोकहिताला प्राधान्य द्यावे लागेल, मागील काळात सत्तेत एकत्र असूनही या दोन्ही पक्षांकडून (भाजप आणि शिवसेना) परस्परांवर टिका-टिप्पणी मोठ्या प्रमाणात केली गेल्याचे जनतेने पाहिले आहे. महाआघाडीच्या सरकारने या टक्केपेक्षा राज्याच्या विकासात केंद्रस्थानी ठेवून त्यादृष्टीने आवश्यक उपाय योजनांना गती देण्यासाठी पक्षांनी विचारमंथन करून कृती करायला हवी, विशेषतः राज्यामध्ये असलेया बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी, उद्योगधंदे वाढीला लावले पाहिजे. कोणताही उद्योजक, कोणत्याही राज्यात गुंतवणूक करताना त्या राज्यात राजकीय आणि सामाजिक स्थैर्य आहे का? याचा विचार करत असतो. त्यामुळे महाआघाडी सरकारने आमच्यामध्ये एक वाक्यता आहे. ध्येय एक आहे हे उद्दिष्टएकटेपणाचा विचार एक आहे. हे प्रत्यक्ष कृतीतून दिसून आले पाहिजे. त्यासाठी पक्षांना आचारसंहिता देखील ठरवावे लागेल आणि त्याचे पालन करावे लागेल, यासाठी समजूतदारपणा दाखवावा लागेल, विशेषतः एखाद्या निवडणुकीचे वेळ आणणारा नाही. जनतेने योग्य तो संदेश दिला आहे. एक निवडणूक पार पाडण्यासाठी सरकारचा बराचसा पैसा खर्च होत असतो. त्यासाठी बरीच यंत्रणा कामाला लागत असते.

हा सर्व खर्च जनतेकडून कररुपाने गोळा केलेल्या पैशातून होत असतो हे असताना केवळ एखाद्या नेत्यांच्या निर्णयामुळे पुन्हा निवडणूक लागली जात असेल तर ते योग्य नसून यावियी काही मार्गदर्शक उपाय किंवा कायदेशीर धोरणे ठरविण्याची गरज आता निर्माण झाली आहे

| पक्ष | संख्या |
|---|---|
| भाजप | १०५ |
| शिवसेना | ५६ |
| काँग्रेस | ४४ |
| राष्ट्रवादी काँग्रेस | ५४ |
| मनसे | १ |
| वंचित बहुजन आघाडी | ० |
| अन्य | २८ |
| एकूण | २८८ |

महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक पार पडली आणि एक महिन्यानंतर देशाचा महाराष्ट्राच्या निवडणुकीत कोणाची सत्ता स्थापन होणार याचे आकर्षन करण्यासाठी सर्व पक्षांमध्ये मोर्चेबांधणी ही सुरू केली होती, असे समजण्यात आले की, भाजपने १०५ जागांवर मजल मारली आणि शिवसेना ५६ वरती राहिली. त्यामुळे जनतेला असे वाटण्यात आले. महायुतीचे सरकार हे महाराष्ट्रात स्थापन होण्याचे महत्त्व आह. प्रत्यक्षात विचार आणला तर शरद पवार यांनी जादू ही विकासात्मक ठरली कारण, शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तिन्ही पक्षांनी मिळून महाराष्ट्रात महाआघाडी सरकार स्थापन केले आणि भाजप सरकारला दूर ठेवण्याचे प्रयत्न यशस्वी ठरले. त्यामुळे महाराष्ट्रात विकासाला चालना ही अधिक मिळाली.

**राष्ट्रीय राजकारणावर डिजिटल आणि भावनात्मक विचारांचा प्रभाव :**

लोकसभा निवडणुकीचा विचार केला असे, पक्षांच्या संघटन व प्रचार पद्धतीने डिजिटल माध्यमांचा प्रभाव आपणालादिसून आला. कारण भाजप आपणाला दिसून आला कारण भाजप आणि काँग्रेसच्या लोकसभा सत्तास्पर्धेमध्ये डिजिटल माध्यमांनी राष्ट्रीय राजकारणांविषयी सार्वजनिक प्रचारांचा जनतेला मंत्र अतिगतिशिलता बनवला गेला आहे. म्हणजेच देशातील तरुण साक्षर आहे. इंटरनेटमुळे त्याचे जगाचे व भारताचे आकलनाचा वेग हा वाढत गेला आहे. जनतेच्या मनातील दूरदृष्टी व्यापक झाली आहे. त्यामुळे भारतात जातीपातीचे राजकारण न करता

सत्ताधारी भाजपास सगळ्याच राजकीय पक्षीयांनी डिजिटल माध्यमांचा वापर हा तरुणांच्या समोर विकासाचा पर्यायी अजेंटा मांडून तरुणांचे प्रश्न जाणून घेण्याचा प्रयत्न हा आपल्यासमोर केला आहे. ग्रामीण नागरी समाज आणि सार्वजनिक अवकाश यांच्यामध्ये व्हॉटस्अॅप, फेसबुक आणि संगणक ट्विटर यांच्या माध्यमातून एकोपा जनतेसमोर घडवून आणण्यात भाजपला यश मिळाले आणि त्यांनी डिजिटल स्वयंसेवक नावाची एक राजकीय कार्यकर्त्यांची त्यांनी डिजिटल स्वयंसेवक जनतेसमोर मांडण्यात यश आले. तसेच भावनात्मक राजकारणातील विचारांचा प्रभाव हा गेल्या काही काळात आला आहे. ७५ वर्षांच्या काळात आणि विचार केला तर प्रत्येक राजकीय पक्ष हा देशात सार्वत्रिक निवडणुकीला सामोरे जात असताना एका विशिष्ट धर्मांच्या जाती, प्रदेशववादाचा अजंठा हा राजकारण करत असतो.पण असाविचार केला १७ वी लोकसभा निवडणुकीत विचार करता नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली राष्ट्र-राष्ट्र, राष्ट्रभक्ती, देशभक्ती या भावनात्मक राजकारणांची सुरुवात केली. त्यासाठी त्यांना मी एक चौकीदार आहे. या टॅगखाली भारत भ्रष्टाचार मुक्त करण्याची देशातील तरुणाईला म्हणजेच नागरिकांना एक आशा दाखविली. मी देशाचा चौकीदार आहे. मी नाही खाणार आणि जनतेला खायला पणदेणार नाही, अशी त्यांनी मोठी घोषणा केली आहे. त्यानंतर आपणाला चालू घडामोडीद्वारे असलेले उदाहरण म्हणजे पुलवामा हल्ला, बागलकोट हल्ला असे अनेक कारणांचे राजकारण करत भारतीय जनसामान्यांच्या मनात भक्ती (राष्ट्रीय भक्ती) भावनात्मक राजकारण सुरू केले आहे. तुम्ही दिलेले भाजपलाा मत हे लष्कराला बलिदान आहे, अशा प्रकारची खंत भूमिका ही घेतली आहे व राष्ट्रप्रेम या देशभक्तीचे मोदींना भावनात्मक राजकारण हे आपल्याला दिसून आले आहे.

**राजकारणातील महाराष्ट्र सरकारचा प्रभाव :** पुढील काही दिवसात महाराष्ट्राच्या राजकारणात प्रभाव असेल पण राज्यातील नव्या सरकारने किमान समान कार्यक्रमात सरकारने किमान समान कार्यक्रम म्हणजेच लोककेंद्री विकासाचे ध्येय ठेवल्याने राज्याचा प्रभावात हा ठोस अपेक्षा आपल्या सरकारला ठेवायला हव्यात.

विविध काळासाठी सादर होणारा प्रभाव हा महाराष्ट्राच्या राजकारणात जनतेला महत्त्वाचा ठरला आहे, असे वाटते. सरकारचा पहिलाच प्रभाव किमान समान कार्यक्रमावर चालते. त्यात प्रमुख महत्त्वाच्या बाबी पुढीलप्रमाणे :

१. राज्याचा महसूल वाढविणे.
२. महाराष्ट्रातील बेरोजगारी हटविणे आणि दारिद्र्य निर्मुलन करणे.
३. धोरणात्मक मुद्यांसाठी आर्थिक तरतूद करणे.

याचा अर्थ असा की, औद्योगिक उत्पादनात वाढ करण्यासाठी सरकारला प्रयत्न करावे लागणार. त्याखेरील एकंदर वाढ होणार नाही आणि सध्याच्या महाराष्ट्रातील राजकारणाचा प्रभाव पद्धती मागणी नाही. या सध्याच्या वाढदरावर आपणाला दुष्पपरिणाम होतो. महाराष्ट्रातील राजकारणात राज्याच्या रोजगारात मागणीत वाढ व्हावी, या दृष्टीने धोरण सरकारला आखावे लागणार आहे.

**निष्कर्ष :**

१. राजकारणातील विविध पक्षांची राजकीय संकल्पना घेणे.
२. महाराष्ट्रातील राजकारण, समाजकारण आणि इतिहास समजावून घेणे.
३. राष्ट्रीय व विधानसभा निवडणुकीतील प्रभाव ही संकल्पना समजावून घेणे.

**संदर्भ :**

१. दैनिक पुढारी
२. दैनिक सकाळ
३. दैनिक लोकसत्ता
४. दैनिक तरुणभारत
५. डॉ. भगणे रविंद्र : विधानसभा निवडणूक आणि विदर्भ.

**वेबसाईट**

1. www.eci.gov.in/maharashtra.
2. www.novjyot.net
3. http://maharashtratimesindia.com